**नगर रचना आणि मूल्य निर्धारण विभाग**
**मध्यवर्ती कार्यालये, पुणे-४११००१.**

फोन नं.०२०-२६१२२०७६ Email:-ddtpho_pune@rediffmail.com
फॅक्स-०२०/२६१२७०४१ Email:-do_tpv1@rediffmail.com

131

जा.क्र.वि.यो.कोल्हापूर/रि.स.नं.८५/अ/भू.क्र.५/टीपीव्ही-१/ 800 दि.७ .२.२०१८.

प्रति,

आयुक्त,
कोल्हापूर महानगरपालिका,
कोल्हापूर.

**विषय** : "ड" वर्ग विकास नियंत्रण व प्रोत्साहनपर नियमावली मधील सामासिक अंतराबाबत मार्गदर्शन मिळणेबाबत.

**संदर्भ** : आपले पत्र क्र.नगर रचना विभाग/वशि-१/२४६५/२०१७ दि.२९.११.२०१७

विषयांकित प्रकरणी शासनाने दि.२०.९.२०१६ च्या अधिसूचनेद्वारे "ड" वर्ग महानगरपालिकांकरीता मंजूर केलेल्या विकास नियंत्रण नियमावलीतील तक्ता क्र.९ (रस्त्याची रुंदी, आवश्यक भूखंड क्षेत्र व आवश्यक सामासिक अंतरे) मधील तरतूदींचा उल्लेख करुन मार्गदर्शन अपेक्षिले आहे.

विषयांकित जमिनीतील रहिवास वापराचे रेखांकनास कोल्हापूर महानगरपालिकेने दि.१९.१०.२०१२ रोजी मंजूरी दिली असून या मंजूर रेखांकनानुसार विषयांकित भूखंड क्र.५ हा रेखांकनाअंतर्गत ७.५० मी. रुंदीच्या रस्त्यास सन्मुख आहे.

भूखंड धारक यांनी उक्त भूखंडात स्टिल्ट+३ मजले स्वरुपाचे बांधकामास पुढील सामासिक अंतर ४.५० मी. व मागील तसेच बाजूचे सामासिक अंतर २.२५ मी. प्रस्तावित करुन अशा बांधकाम नकाशास मंजूरी अपेक्षिली आहे.

शासनाने दि.२०.९.२०१६ रोजी "ड" वर्ग महानगरपालिकांकरीता मंजूर केलेल्या विकास नियंत्रण नियमावलीमधील नियम क्र.२६.२ खालील तक्ता क्र.९ मधील अ.क्र.७ नुसार ९ मी. रुंदी पर्यंतच्या रस्त्यास सन्मुख भूखंडात जास्तीत जास्त तळ+२ मजले किंवा स्टिल्ट+२ मजले स्वरुपाच्या इमारतीस रस्ता सन्मुख सामासिक अंतर ३ मी. व इतर बाजूस १.५० मी. आवश्यक आहे.

भूखंड धारक यांनी विषयांकित भूखंडात स्टिल्ट+३ मजले म्हणजेच वर नमूद मजल्यापेक्षा एका वाढीव मजल्याचे बांधकाम प्रस्तावित केले आहे. त्यामुळे या बांधकामास उक्त तक्ता क्र.९ खालील टिप क्र.१ नुसार नियम क्र.२६.२.४ मधील तक्ता क्र.१० मधील अ.क्र.२ प्रमाणेची सामासिक अंतरे प्रस्तावित करणे आवश्यक आहे.

उक्त तक्ता क्र.१० मधील अ.क्र.२ नुसार तक्ता क्र.९ मधील अ.क्र.७ मध्ये नमूद उंची पेक्षा जादा उंचीच्या इमारतीस मागील व बाजूची सामासिक अंतरे H/४ किंवा कमीत कमी ३ मी. अशी प्रस्तावित करणे आवश्यक आहे.

(मसूदा मा.संचालकांनी मंजूर केला आहे)

(सं.जं.माने)
संचालक, नगर रचना,
महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेकरिता

**प्रत**:- १) सहसंचालक, नगर रचना, पुणे विभाग, पुणे.
२) उपसंचालक, नगर रचना, नागरी संशोधन घटक, पुणे.
/- त्यांनी सदर मार्गदर्शन सर्व विभागीय कार्यालय व शाखा कार्यालयास पाठवावे.
३) उपसंचालक, नगर रचना, मुख्य कार्यालय, पुणे.
४) सहायक संचालक, नगर रचना, कोल्हापूर शाखा, कोल्हापूर.

9/2/18

Circulate to divisions